# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## बुधवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६
## (सकाळी ११-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे –**

(१) **मुख्यमंत्री** : महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा दिनांक ३१ मार्च, २०२४ रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचा पन्नासावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(२) कृषी मंत्री** : महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : अंदाज समितीचा पहिला अहवाल सभागृहास सादर करणे.**

**चार : स्थगन प्रस्तावाच्या सूचना – (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**पाच : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

(१) **सर्वश्री. अतुल भातखळकर, काशिनाथ दाते, सुधीर मुनगंटीवार, अबू आझमी, गोपिचंद पडळकर, सुरेश धस, विजय वडेट्टीवार, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्यातील मिंथूर येथील एका अल्पभूधारक शेतकऱ्याला खासगी सावकारांनी कर्जाच्या विळख्यात ओढून परदेशातील कंबोडियात जाऊन त्याची किडनी विकण्यास भाग पाडल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, संबंधित शेतकऱ्याने ब्रह्मपुरी येथील एका सावकाराकडून एक लाख रुपये व्याजाने घेतलेले असता संबंधित सावकाराने अवाजवी व्याज आकारल्याने १ लाखाची रक्कम ७४ लाखावर जाणे, मात्र नापीक जमीन असल्यामुळे कर्ज फेडणे शक्य न झाल्याने शेतकऱ्याने आपली जमीन व मोटरसायकल विकूनही कर्ज न फिटल्याने शेवटी परदेशातील कंबोडियात जाऊन त्याची एक किडनी विकल्याचे वैद्यकीय अहवालातून उघडकीस येणे, चंद्रपूर आणि नागभीड परिसरातून निदर्शनास आलेल्या किडनी रॅकेट प्रकरणाचे संबंध दिल्ली, तामिळनाडू आणि पंजाबपर्यंत पसरले असल्याचे तसेच यामध्ये कंबोडियासारख्या परदेशातील रुग्णालयांचा सहभाग असल्याचे उघड होणे, राज्यात सहकारी संस्था,

पतपेढ्या, राष्ट्रीय बँका यांची मोठया प्रमाणात सुविधा असतानाही खासगी परवानाधारक सावकारांच्या संख्येत वाढ झालेली असणे, या सावकारांविरुद्ध राज्य शासनाने सावकारी प्रतिबंधक कायदा, मानवी अवयव तस्करी प्रतिबंधक कायदा व इतर लागू असलेल्या कायद्यांनुसार फौजदारी कारवाई करण्याची आवश्यकता, राज्यातील ग्रामीण भागात फोफावलेली अवैध सावकारी मोडून काढण्यासाठी आणि गरीब शेतकऱ्यांना या किडनी रॅकेटपासून वाचवण्यासाठी विशेष तपास पथकांमार्फत (SIT) राज्यव्यापी कारवाई मोहीम राबवण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

**(२) श्री. निलेश राणे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सिंधदुर्ग जिल्हयात जवळजवळ ४२२४२ हेक्टर क्षेत्रावर सन १९९६ साली वनसंज्ञा लादण्यात येणे, संपूर्ण राज्यात ६२ हजार क्षेत्र वनसंज्ञेखाली घेण्यात येणे, परंतु त्यावेळी फक्त एकटया सिंधुदुर्ग जिल्हयात ४२ हजार क्षेत्र वनसंज्ञेखाली घेण्यात येणे, त्यामुळे जिल्हयातील अनेक गावे, बाजारपेठा, मंदिरे, शाळा, दवाखाने, शेत जमिनी, बागायती आदि वनसंज्ञेखाली दर्शविण्यात येणे, त्यामुळे जिल्हयाचा विकास खुंटला असणे, सर्व विकास कामे ठप्प झालेली असणे, जिल्हयात असलेल्या डोंगर द-यांमुळे विकास होईल असे जमीन क्षेत्र शिल्लक न राहणे, चुकीच्या पध्दतीने वनसंज्ञा /वन नोंद झाल्यामुळे सद्यस्थितीत जिल्हयातील ३०० पेक्षा जास्त गावे विकासापासून वंचित राहिलेली असणे, शेतक-यांच्या हक्काच्या जमीनी असूनही त्यांना लाभ घेता येत नसणे, अनेकदा शेतक-यांच्या जमिनी शासकीय कामाकरिता संपादित केल्या जाणे परंतु वन नोंदीमुळे त्याचा शेतक-यांना मोबदला न मिळणे, सदर मोबदला शासन जमा होणे, वनसंज्ञा व वन नोंदी झाल्यामुळे शेतक-यांची अवस्था ना जमिनी, ना शेती, ना मोबदला अशी होणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी शेतक-यांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेली चिड, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून सिंधुदुर्ग जिल्हयात नव्याने सर्व्हेक्षण करुन प्रत्यक्षातील वनक्षेत्र, खाजगी वनक्षेत्र व वनसंज्ञा यांची नव्याने नोंद करुन शेतक-यांना न्याय देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. हेमंत ओगले, अमित विलासराव देशमुख, रोहित पवार, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात मुलींच्या जन्मदरामध्ये वाढ व्हावी यासाठी लेक लाडकी, माझी कन्या भाग्यश्री, सुकन्या समृध्दी योजना यांसारख्या अनेक योजना असतानाही १ हजार पुरुषांमागे महिला जन्मदराचे प्रमाण ८७० ते ८९४ असल्याची बाब दिनांक ९ फेब्रुवारी, २०२६ रोजी निदर्शनास आलेली असणे, गर्भधारणापूर्व, प्रसूतीपूर्व गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायदा असतानाही महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात मुलींच्या जन्माचे स्वागत होत नसल्याचे दिसून येणे, राष्ट्रीय कुटूंब आरोग्य सर्वेक्षणामध्ये महाराष्ट्रातील २४ जिल्ह्यांत लेक नकोशी असल्याची गंभीर माहिती

उघडकीस येणे, मुलगी म्हणजे ओझे, जबाबदारी, घराण्याची अप्रतिष्ठा या पारंपारिक जोखडातून महाराष्ट्र अजूनही बाहेर पडलेला नसल्याची बाब राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणात नोंदवलेल्या मुलींच्या घटत्या जननदरांवरुन दिसून येणे, गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायदा पारीत करणारे महाराष्ट्र हे जगातील पहिले राज्य असतांनाही सदरचे कायदे डावलून शहरी, निमशहरी आणि महानगरांमध्ये गर्भलिंग निदान व गर्भपात केंद्रे प्रशासकीय व्यवस्थेच्या आशीर्वादाने राजरोसपणे सुरु असणे, महाराष्ट्रात ५४ हजारपेक्षा जास्त मुली गर्भातच मारल्या जात असणे, सदर गंभीर प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करुन कार्यवाही करण्याची सामाजिक संघटना, लोकप्रतिनीधी यांनी मा.मुख्यमंत्री व मा.सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री यांचेकडे दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ रोजी तसेच वारंवार मागणी करणे, या प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई व याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यात महिला जन्मदराचे प्रमाण चिंताजनक पातळीवर असल्याने या प्रकरणी उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता, यासंदर्भात शासनाने वेळीच हस्तक्षेप करुन तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

**सहा : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस)**

**सात : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ - महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२६

---

**(ब) विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

**(१) (क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२५ चा अध्यादेश क्रमांक १३ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) अध्यादेश, २०२५ नापसंत करते."

**(ख) सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२६**

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त

समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, डॉ.ज्योती गायकवाड, डॉ.विश्वजित कदम, श्री.साजिद पठाण, रामदास मसराम व हेमंत ओगले, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ – महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२)** **(क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२५ चा अध्यादेश क्रमांक १४ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) अध्यादेश, २०२५ नापसंत करते."

(ख) **सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ – महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) विधेयक, २०२६**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ – महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, डॉ.ज्योती गायकवाड, डॉ.विश्वजित कदम, श्री.साजिद पठाण, रामदास मसराम व हेमंत ओगले, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ – महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

आठ : (मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)

सर्वश्री रणधीर सावरकर, अब्दुल सत्तार, अनिल पाटील, सुधीर मुनगंटीवार, अर्जुन खोतकर, मनोज कायंदे, प्रशांत बंब, दिपक केसरकर, चेतन तुपे, सुरेश धस, तानाजी सावंत, शेखर निकम, श्रीमती सीमा हिरे, सर्वश्री रमेश बोरनारे, प्रताप पाटील-चिखलीकर, चैनसुख संचेती, राजेंद्र गावित, चंद्रकांत नवघरे, डॉ. संजय कुटे, सर्वश्री विजय शिवतारे, राजेश विटेकर, प्रकाश भारसाकळे, राजेश क्षिरसागर, नितीन पवार, श्रीमती श्वेता महाले, श्री. प्रदिप जैस्वाल, श्रीमती सरोज अहिरे, श्री. उमेश यावलकर, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री शंकर मांडेकर, बबनराव लोणीकर, विलास तरे, सुनिल शेळके, संभाजी निलंगेकर-पाटील, अतुल भातखळकर, संजय उपाध्याय, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. चंद्रदिप नरके, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री मंगेश चव्हाण, नरेंद्र भोंडेकर, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री प्रवीण दटके, मंगेश कुडाळकर, सचिन पाटील, गोपीचंद पडळकर, किशोर पाटील, राजकुमार बडोले, सुरेश भोळे, शांताराम मोरे, नारायण कुचे, प्रकाश सुर्वे, हरिष पिंपळे, निलेश राणे, राजू तोडसाम, तुकाराम काते, अभिमन्यू पवार, अशोक पाटील, देवराव भोंगळे, चंद्रकांत सोनवणे, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री बालाजी कल्याणकर, योगेश सागर, समीर कुणावार, सुहास कांदे, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री संजय गायकवाड, सत्यजित देशमुख, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री विक्रम पाचपुते, महेंद्र थोरवे, सुमित वानखेडे, महेंद्र दळवी, सुभाष देशमुख, चंद्रकांत पाटील, डॉ. आशिष देशमुख, सर्वश्री संतोष बांगर, सुनिल कांबळे, राजेश बकाने, डॉ. अतुल भोसले, सर्वश्री दिलीप लांडे, किशोर जोरगेवार, महेश शिंदे, राजेश पवार, आमश्या पाडवी, संतोष दानवे, हिकमत उढाण, राम कदम, संजय केळकर, मिहिर कोटेचा, केवलराम काळे, ॲड.श्रीजया चव्हाण, सर्वश्री बाबुराव कदम-कोहळीकर, राणाजगजितसिंह पाटील, अमोल खताळ, ॲड. राहुल कुल, श्रीमती रंजना जाधव, सर्वश्री अमोल जावळे, आनंद तिडके, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री मुरजी पटेल, राघवेंद्र पाटील, अमोल पाटील, समाधान आवताडे, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री सुहास बाबर, राजेश पाडवी, विलास भुमरे, काशिराम पावरा, राजेश मोरे, दिलीप बोरसे, विठ्ठल लंघे, प्रताप अडसड, किरण सांमत, श्रीमती सई डहाके, डॉ. अशोकराव माने, सर्वश्री मोहन मते, राजेंद्र यड्रावकर-पाटील, कृष्णा खोपडे, शरद सोनवणे, विनोद अग्रवाल, शिवाजी पाटील, जितेश अंतापुरकर, किर्तीकुमार भांगडीया, सर्वश्रीमती अनुराधा चव्हाण, नमिता मुंदडा, सर्वश्री रमेश कराड, संजय पुराम, विजय रहांगडाले, समीर मेघे, चरणसिंग ठाकूर, करण देवतळे, भीमराव केराम, तुषार राठोड, तानाजी मुटकुळे, अनुपभैय्या अग्रवाल, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री श्याम खोडे, प्रविण तायडे,

**शंकर जगताप, सिध्दार्थ शिरोळे, देवेंद्र कोठे, विजय देशमुख, हेमंत रासने, भिमराव तापकीर, अमल महाडिक, सुरेश खाडे, राहुल आवाडे, मनोज घोरपडे, सुधीर गाडगीळ, महेश लांडगे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यातील शेतक-यांच्या उत्पन्न वाढीसाठी, शाश्वत शेतीसाठी आणि जागतिक स्पर्धात्मकतेसाठी **'AI for Agri २०२६'** ही परिषद शेतकऱ्यांना जागतिक तंत्रज्ञानाची ताकद देण्याकरिता नवा टप्पा ठरणार असणे, कृषी क्षेत्रासाठी स्वतंत्र AI धोरण तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असणे, 'महाॲग्री-एआय' धोरण २०२५-२०२९ अंतर्गत शेतीमध्ये आर्टिफिशियल इन्टेलिजन्स, जनरेटिव्ह एआय, ड्रोन आणि रॉबोटिक्सचा वापर सुरु होणार असणे, राज्यात शेतकऱ्यांच्या आयुष्यात क्रांती घडविणारी 'मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजना' राबविण्याचे धोरण असणे, या योजनेसाठी मनरेगा व इतर १३ विविध योजनांमधून आणि सीएसआर निधीमधून निधी उपलब्ध केला जाणार असणे, या योजनेमध्ये रस्त्यासाठी लागणारी मोजणी आणि पोलीस बंदोबस्ताचे शुल्क शासनाने पूर्णपणे माफ केले असणे, रस्त्याच्या मजबुतीकरणासाठी लागणारे गाळ, माती, मुरुम आणि दगडासाठी कोणतीही रॉयल्टी लागणार नसणे, राज्यात आक्रमक बिबटे, वाघ व अन्य वन्य प्राण्यांमुळे शेतीला धोका निर्माण होत असल्याने या प्राण्यांना शेडयूल १ मधून शेडयूल २ मध्ये आणण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन असणे, वन्यजीव हल्ल्यात मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरीत सामावून घेण्यात येणार असणे, २०२६ च्या खरीप हंगामापासून वन्य प्राण्यांच्या पिक नुकसानीची भरपाई पंतप्रधान पिक विमा योजनेतून देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला असणे, भातपिकाला पूर वा अतिवृष्टीचा फटका बसल्यास पिक विमा योजनेतून संरक्षण देण्याचा निर्णय घेतला असणे, पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यात १८०० बिबटे ठेवण्यासाठी जंगलात रेस्क्यू सेंटर उभारण्याचे धोरण असणे, या विषयासंदर्भात शासनाने करावयाची अधिकची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी.**"**

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : २४ फेब्रुवारी, २०२६.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.